# -:प्रेस नोट:-

## आलोसे क्र. १ मोहम्मद अकिल इस्माईल शेख, वय ५४ वर्ष, नौकरी लिपीक, समाजसेवा विघालय वाढोना ता. नागभीड जि. चंद्रपुर , आरोपी क्र. २ श्रीकृष्ण परसराम शेंडे वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, वाढोणा ता. नागभीड जि. चंद्रपुर (खाजगी इसम )यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर पथकाची कारवाई

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे मौजा नागभीड येथील रहिवासी असुन ते समाजसेवा विघालय वाढोणा ता. नागभीड जि. चंद्रपुर येथुन मुख्याध्यापक पदावरून सन २०२२ मध्ये सेवानिवृत्त झाले आहे. तक्रारदार यांचे सेवानिवृत्ती नंतर सेवाकालावधी दरम्यान जमा असलेले अर्जीत रजेच्या नोंदी प्रमाणीत करण्याकरीता व मुख्याध्यापक यांचे कवरींग पत्र लेखाधिकारी शिक्षण विभाग जि.प. चंद्रपुर यांचेकडे पाठविण्याकरीता समाजसेवा विघालय वाढोणा येथील गैरअर्जदार कनिष्ठ लिपीक मोहम्मद अकिल इस्माईल शेख, वय ५४ वर्ष यांना संपर्क केला असता गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना वरील काम करून देण्याकरीता १५०००/— रू. लाचेची मागणी केली.

परंतु तक्रारदार यांना आलोसे क्र. १ मोहम्मद अकिल इस्माईल शेख, वय ५४ वर्ष यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे येवुन दिनांक ०६/०८/२०२४ रोजी तक्रार नोंदविली. प्राप्त तक्रारीवरून दिनांक ०७/०८/२०२४ रोजी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी/सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यामध्ये पडताळणी कार्यवाहीदरम्यान आलोसे क्र. १ कनिष्ठ लिपीक मोहम्मद अकिल इस्माईल शेख वय ५४ वर्ष यांनी तक्रारदार यांना त्यांचे अर्जीत रजेच्या नोंदी प्रमाणीत करण्याकरीता व मुख्याध्यापक यांचे कवरींग पत्र लेखाधिकारी शिक्षण विभाग जि.प. चंद्रपुर यांचेकडे पाठविण्याचे कामाकरीता १५०००/— रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणुन ५०००/— रू. आधी स्विकारण्याचे व काम पुर्ण झाल्यानंतर १०,०००/— रू. नंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली.

त्यावरून आज दि. ०८/०८/२०२४ रोजी आलोसे क्र. १ यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन मौजा वाढोणा येथिल चौरस्ता येथील अपना टि स्टॉल अॅन्ड नास्ता पॉईन्ट येथे बोलाविल्याने तेथे पंचासमक्ष सापळा कार्यवाही आयोजीत केली असता सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र. १ मोहम्मद अकिल इस्माईल शेख यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी करून ५,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारून त्याचे जवळ उभे असलेले खाजगी इसम नामे श्रीकृष्ण परसराम शेडे वय ३४ वर्ष रा. वाढोणा ता. नागभीड जि. चंद्रपुर यांचेकडे दिले असता दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. राहुल माकणीकर,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात तसेच श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक लाप्रवी कार्यालय चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात , पोलीस निरीक्षक जितेन्द्र गुरनुले, पोहवा नरेश नन्नावरे, पोशी राकेश जांभुळकर, अमोल सिडाम, मपोशी मेघा मोहुर्ले, चालक पोहवा रवि तायडे यांनी यशस्वी पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

**<u>भ्रष्टाचाराविरूध्द तक्रारीसाठी आमच्याशी संपर्क साधा</u>**

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक :— ०७१२—२५६१५२०
  श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी :— ०७१७२—२५०२५१
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ९३२२२५३३७२
  श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ८८८८८५७१८४

- टोल फ्रि क्रमांक :— १०६४
- ऑनलाईन तक्रारीसाठी वेबसाईटः— www.acbmaharashtra.gov.in /acbmaharashtra.net

(जितेन्द्र गुरनुले)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्यूरो, चंद्रपूर